डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ व्या जयंती वर्षानिमित्त मौजे हरेगाव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: स्वसेस-२०१६/ प्र.क्र.१५०/ बांधकामे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :- १) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सान्यावि-२०१५/ प्र.क्र.१६३/ बांधकामे, दि.९/१०/२०१५.
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. बैठक-२०१६/ प्र.क्र.४७५/ बांधकामे, दि.२४/३/२०१७.
३) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/मावक/ऐति.स्थळ/२०१७-१८/ का.१२/ ३८९, दि.१५.०१.२०१८.

प्रस्तावना :-

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे या अंतर्गत संदर्भ क्र.१ अन्वये मा.मंत्री (सा.न्या.वि.स.) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.१/८/२०१६ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये अनुसूचित जाती नवबौध्द घटकासाठी ऐतिहासिक व सांस्कृतीकदृष्टया महत्व असलेल्या एकूण २८ ठिकाणे/स्थळांची यादी अंतिम करण्यात आली असून त्यामध्ये मौजे हरेगाव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधण्यासाठी रु.९५ लाख निधी मंजूरी बाबत संदर्भीय क्र.२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संदर्भ क्र. ३ अन्वये आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्यामार्फत मौजे हरेगाव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधण्यासाठी रु.९५,००,०००/- (रुपये पंच्याण्णव लाख फक्त) इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास मान्यतेसाठी शासनास सादर केला आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक सहायक अभियंता (वर्ग-२), जि.प. (आर.डब्ल्यु.एस) उप विभाग, श्रीरामपूर यांनी तयार केले असून उप अभियंता, जि.प. (आर.डब्ल्यु.एस) उप विभाग, श्रीरामपू यांनी साक्षांकित केले आहे. त्यानुषंगाने सदर कामाच्या रु.९५,००,०००/- (रुपये पंच्याण्णव लाख फक्त) इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मौजे हरेगाव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधण्यासाठी रु.९५,००,०००/- (रुपये पंच्याण्णव लाख फक्त) इतक्या रकमेचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागास सादर केले होते.

त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केलेल्या सुधारित रक्कम रु.९५,०६,०००/- (रुपये पंच्याण्णव लाख सहा हजार फक्त) इतक्या रकमेच्या खर्चास पुढील अटींच्या अधिन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.
२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.
३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि.१०/१/२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
४) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

५) प्रस्तुत कामावरील खर्च हा संदर्भ क्र.२ येथे नमूद दि.२४/३/१७ च्या शासननिर्णयातील परिच्छेद २ नुसार कार्यकारी अभियंता तथा संमन्वयक, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचे अधिनस्त ठेवण्यात आलेल्या निधीतून करावा.

३. या करीता आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांनी या कामासाठीचा निधी, वित्त विभागाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार त्या त्या टप्प्यावर सदरहू कामाकरीता वितरीत करावा.

४. प्रस्तुतचा शासन निर्णय, दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठित समितीस प्राप्त अधिकार तसेच वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२२१६२८५१५३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a473 56798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.02.22 16:29:57 +05'30'

(अ.कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे.

४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक.
५) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर.
६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर.
७) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/ नागपूर.
९) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक.
१०) सहायक आयुक्त, समाजकल्याण, अहमदनगर.
११) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ अहमदनगर.
१२) सरपंच, मौजे हरेगाव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर
१३) मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१४) मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१५) निवडनस्ती / बांधकामे.